ISSN 2231-1629
Knowledge Resonance
IMPACT FACTOR 8.072
July – December 2022- Vol. 11 No. 2

# भारतातील आरोग्य क्षेत्राची स्थिती

डॉ. मगर एस. आर.

*श्रीमती. एस. के. गांधी कॉलेज, कडा.*

**सारांश:**

*"कोणत्याही देशाचा विकास हा तेथील सशक्त मनुष्यबळावरच अवलंबून असतो, भारतही याला अपवाद नाही. देशाच्या स्वातंत्र्यप्राप्तीपासून ते आजपर्यंत शासनाने वेळोवेळी विविध आरोग्य धोरणाच्या माध्यमातून देशाची आरोग्य व्यवस्था सुधारण्याचा प्रयत्न केलेला आहे. देशामध्ये दरवर्षी जवळपास सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या दोन टक्के खर्च सार्वजनिक आरोग्य सेवांवर करण्यात येतो, यामुळे देशामध्ये विविध आरोग्य सुविधांची उपलब्ध होते. देशामध्ये ग्रामीण भागात आणि शहरी भागात शासकीय रुग्णालयाद्वारे आरोग्य सुविधा पुरवल्या जातात. तसेच गरीब नागरिकांसाठी विविध योजनांच्या माध्यमातून अर्थसहाय्य पुरवले जाते. देशातील नागरिकांमध्ये आरोग्याप्रति जागरूकता नसल्यामूळे विविध आजाराने मृत्यू पावण्याचे प्रमाण जास्त आहे. देशातील नागरिक स्वत:हून आरोग्यावर खूप मोठ्या प्रमाणामध्ये खर्च करतात. परिणामी त्यांना विविध आरोग्य संकटांना सामोरे जावे लागत आहे. देशातील उपलब्ध सार्वजनिक आरोग्य सुविधांवर नागरिक विश्वास ठेवत नसल्यामुळे ते खासगी रुग्णालयामध्ये उपचार घेण्यासाठी प्राथमिकता देतात यामुळे नागरिकांना आर्थिक समस्येला तोंड द्यावे लागत आहे."*

*प्रमुख शब्द:*

*सार्वजनिक आरोग्य, शासकीय रुग्णालये, आजार, आरोग्यावरील खर्च.*

**उद्देश:**

भारतातील आरोग्य क्षेत्राची स्थिती जाणून घेणे आणि त्याचे विश्लेषण करणे.

**व्याप्ती:**

या शोधनिबंधाची व्याप्ती आरोग्य क्षेत्रापुरतीच मर्यादित असून, यामध्ये केवळ भारतातील आरोग्य क्षेत्राची स्थिती जाणून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**संशोधन पद्धती:**

या शोधनिबंधासाठी दुय्यम साधनांचा उपयोग केला आहे. यामध्ये विविध शासकीय दस्ताऐवज, आंतरराष्ट्रीय संस्थांचा अहवाल, वृत्तपत्रांचे लेख आणि विविध वेबसाइटवरील माहितीचा उपयोग करण्यात आला आहे.

**प्रस्तावना:**

कोणत्याही देशाचा विकास हा तेथील सदृढ व निकोप मनुष्यबळावरच अवलंबून असतो, म्हणूनच देशाच्या विकासामध्ये सशक्त नागरिकांची आवश्यकता असते. ज्या देशामध्ये आरोग्य सुविधा चांगल्या प्रकारे पुरवल्या जातात, त्या देशातील नागरिकांचे आरोग्य निकोप राहण्यास मदत होते. आज जगामधील विविध देश आरोग्य सुविधेवर प्रचंड प्रमाणात पैसा खर्च करत आहेत व नागरिकांना चांगल्या आरोग्य सुविधा पुरवत आहेत. यावरून असे म्हणता येते की, आरोग्य सुरक्षा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे भारतही याला अपवाद नाही. आज भारतामध्ये आरोग्यसेवावर खूप मोठ्या प्रमाणामध्ये पैसा खर्च करण्यात येत आहे. शासनामार्फत आरोग्य मंत्रालयाच्या माध्यमातून दरवर्षी विविध कार्यक्रम व अभियानाद्वारे देशातील नागरिकांना आरोग्याच्या सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. देशाच्या स्वातंत्र्यप्राप्तीपासून ते आजपर्यंत देशातील आरोग्य क्षेत्राची म्हणावी तशी प्रगती झाली नाही. देशातील नागरिकांना आरोग्य सेवेच्या बाबतीत बहुतांशी खाजगी आरोग्य क्षेत्रावरच अवलंबून राहावे लागत आहे. देशामध्ये जवळपास ९० टक्के आरोग्यसेवा खाजगी आरोग्य क्षेत्रावर अवलंबून आहेत. यावर देशातील नागरिकांना खूप मोठ्या प्रमाणावर पैसा खर्च करावा लागत आहे. हा खर्च देशातील नागरिक त्यांच्या स्वतःच्या पैशाने भागवत असतात, याबरोबरच नागरिक आरोग्याचा विमा काढत नाहीत. नागरिकांमध्ये आरोग्य विमाच्या बाबतीत जागृती नाही. प्रगत देशांच्या तुलनेत भारतातील आरोग्यावर नागरिकांकडून होणारा खर्च खूप जास्त आहे, तर शासना मार्फत केला जाणारा आरोग्य सुविधांवर खर्च फारच कमी आहे. आर्थिक सर्वेक्षण

२०२१-२२ नुसार देशातील आरोग्य क्षेत्रावर एकूण जीडीपीच्या फक्त २.१ टक्के खर्च करण्यात आला होता. तर २०२०-२१ मध्ये १.८ टक्के आणि २०१९-२० मध्ये १.३ टक्के इतका होता[१]. २०२१-२२ मध्ये कोविड-१९ च्या महामारीमुळे शासनाने आरोग्य क्षेत्रावरील खर्च वाढवला होता.

**शासनामार्फत करण्यात आलेला सार्वजनिक आरोग्य क्षेत्रावरील खर्च**

| घटक | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१ सुधारित तरतूद | २०२१-२२ अंदाजपत्रकीय तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|
| आरोग्य | शासनामार्फत करण्यात आलेला खर्च (आकडे लाख कोटीमध्ये) | | | | | |
| | २.१३ | २.४३ | २.६६ | २.७३ | ३.५० | ४.७२ |
| | GDP च्या टक्केवारीनुसार | | | | | |
| | १.४ | १.४ | १.४ | १.३ | १.८ | २.१ |
| | एकूण खर्चाच्या टक्केवारीनुसार | | | | | |
| | ५.० | ५.४ | ५.३ | ५.० | ५.४ | ६.६ |
| | सामाजिक सेवेतील खर्चाचा वाटा टक्केवारीमध्ये | | | | | |
| | २०.५ | २१.४ | २०.८ | २०.० | २१.४ | २४.७ |


आर्थिक सर्वेक्षण २०२१-२२, पृष्ठ क्र. ३५२

वरील तक्त्यावरून आपणास असे लक्षात येते की, शासनामार्फत सार्वजनिक आरोग्य क्षेत्रावर दरवर्षी खर्च वाढवण्यात येत आहे. इसवी सन २०१६-१७ मध्ये शासनामार्फत करण्यात आलेला खर्च हा २.१३ लक्ष कोटी होता. यामध्ये दरवर्षी वाढ होऊन इसवी सन २०२१-२२ मध्ये तो ४.७२ लक्ष कोटीपर्यंत पोहचलेला आहे. या बरोबरच एकूण खर्चाच्या टक्केवारीमध्ये २०२१-२२ मध्ये ६.६ टक्के खर्च हा आरोग्य क्षेत्रावर करण्यात येत होता तर सामाजिक सेवेतील खर्चाचा वाट्यामध्ये २४.७० टक्के वाटा हा सार्वजनिक आरोग्य क्षेत्रावरील खर्चाचा होता. यावरून असे म्हणता येते की शासनामार्फत दरवर्षी आरोग्य क्षेत्रावर खर्च वाढवण्यात येत आहे, परंतु आजही दर्जेदार आणि अत्याधुनिक सुविधा या सार्वजनिक आरोग्य क्षेत्रामध्ये खूप कमी प्रमाणामध्ये उपलब्ध आहेत. देशातील लोकसंख्येचा विचार केला तर या उपलब्ध सुविधा खूप अत्यल्प प्रमाणात असलेल्या दिसून येतात आणि सार्वजनिक आरोग्यावर शासनामार्फत करण्यात येणाऱ्या खर्चाचे प्रमाणही विकशीत देश्याच्या तुलनेत खूप कमी आहे.

**भारतातील उपलब्ध आरोग्य सुविधा:**


भारत हा लोकसंखेच्या बाबतीत जगात दोन नंबरचे राष्ट्र आहे, इतक्या मोठ्या लोकसंखेला आरोग्य सुविधा पुरवणे खूप आव्हानात्मक काम आहे. स्वातंत्र्यापासून ते आजपर्यंत देशामध्ये विविध आरोग्य धोरणे राबवून आणि विविध योजना व कार्यक्रमाद्वारे देशातील नागरिकांना आरोग्य सुविधा पुरवल्या आहेत. या पुरवण्यात आलेल्या आरोग्य सुविधा लोकसंखेच्या प्रमाणामध्ये खूप कमी आहेत. खलील आलेखावरून भारतातील उपलब्ध आरोग्य सुविधा लक्ष्यात येतील

**भारतातील उपलब्ध आरोग्य सुविधा**



वरील आलेखावरून वरून असे लक्षात येते की, देशामध्ये एकूण ७६४ जिल्हा शासकीय रुग्णालय आहेत, एकूण उपजिल्हा शासकीय रुग्णालयाची संख्या १२२४ एवढी असून ५९५१ सामुदायिक आरोग्य केंद्र आहेत, तर ३०,५१९ प्राथमिक आरोग्य केंद्र असून उपकेंद्रांची संख्या १,५७,८१९ एवढी आहे[२]. यावरून आपणास असे जाणवते की देशाची लोकसंख्या आणि उपलब्ध शासकीय आरोग्य सुविधा यांचे प्रमाण खूप कमी आहे. शासकीय रुग्णालयामध्ये असलेली अस्वच्छता, उपलब्ध सुविधांचा अभाव आणि रुग्णांकडे होणारे दुर्लक्ष यामुळे देशातील नागरिक शासकिय रुग्णालयाऐवजी खासगी रुग्णालयामध्ये उपचार घेणे पसंत करतात. आजच्या काळामध्ये शासकीय रुग्णालयातील परिस्थितीमध्ये सुधारणा होताना दिसून येत आहे.

**भारतातील मृत्यूची प्रमुख कारणे आणि त्यांचे प्रमाण:** देशामध्ये उपलब्ध अपुरी सार्वजनिक आरोग्य व्यवस्था आणि नागरिकांची आरोग्याप्रती असलेल्या निश्काळजीपणा यामुळे विवध आजार होऊन मृतू होण्याचे प्रमाण ज्यास्त आहे. खालील आलेखावरून देशातील मृतूची प्रमुख कारणे आणि त्यांचे प्रमाण लक्ष्यात येते.




वरील आलेखावरून असे लक्षात येते की, देशामध्ये सर्वात ज्यास्त मृतू हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी आजाराने होतात तर त्याखालोखाल असामान्य क्लिनिकल लक्षणे आणि प्रयोगशाळेतील निष्कर्ष, श्वसनाचे आजार, कॅन्सर, प्रसवपूर्व स्थिती, अतिसार, पाचकतेसंबंधी आजार, अनावधानाने झालेल्या जखमा, श्वसन संक्रमणाचे आजार, क्षयरोग आणि इतर आजार यांचा समावेश होतो[३].

**आरोग्यावरील विविध घटकांकडून केला जाणारा खर्च**

| घटक | २०१८-१९ | २०१७-१८ | २०१६-१७ | २०१५-१६ | २०१४-१५ |
|---|---|---|---|---|---|
| चालू किंमतीनुसार एकूण आरोग्य खर्चाच्या प्रती व्यक्ती आरोग्यावरील खर्च | ४४७० | ४२९७ | ४३८१ | ४११६ | ३८२६ |
| एकूण आरोग्य खर्चाच्या शासनामार्फत केला जाणारा खर्च % मध्ये | ४०.६ | ४०.८ | ३२.४ | ३०.६ | २९ |
| एकूण आरोग्य खर्चाच्या नागरीकांमार्फत केला जाणारा खर्च % मध्ये | ४८.२ | ४८.८ | ५८.७ | ६०.६ | ६२.६ |
| एकूण आरोग्य खर्चाच्या आरोग्यावरील सामाजिक सुरक्षा खर्च % मध्ये | ९.६ | ९.० | ७.३ | ६.३ | ५.७ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| एकूण आरोग्य खर्चाच्या खाजगी आरोग्य विमा खर्च % मध्ये | ६.६ | ५.८ | ४.७ | ४.२ | ३.७ |
| एकूण आरोग्य खर्चाच्या देणगीदारा द्वारे दिला जाणारा निधी % मध्ये | ०.४ | ०.५ | ०.६ | ०.७ | ०.७ |

*भारतातील राष्ट्रीय स्वास्थ लेखा अंदाज २०१८-१९, पृष्ठ क्र. ८*

वरील तक्त्यावरून आपणास असे लक्षात येते की, चालू किंमतीनुसार प्रतिव्यक्ती आरोग्यावरील खर्च हा इसवी सन २०१४-१५ मध्ये ₹३८२६ होता. यात वाढ होऊन इसवी सन २०१८-१९ मध्ये तो ₹४४७० इतका झाला होता. शासनामार्फत आरोग्यावर केला जाणारा खर्च जवळपास ४० टक्के आहे तर नागरिकांमार्फत स्वतःद्वारे आरोग्यावर केला जाणारा खर्च हा ४८.२ टक्के आहे आणि देणगीदारद्वारे एकूण आरोग्य खर्चाच्या ०.४ टक्के खर्च केला जातो[४]. यावरून आपणास असे म्हणता येते की देशामध्ये नागरिक स्वतःहून आरोग्यावर खूप मोठ्या प्रमाणावर खर्च करतात, परिणामी त्यांना आर्थिक समस्येला तोंड द्यावे लागते. विकसित देशाचा विचार केला तर त्या देशामध्ये शासनामार्फत आरोग्यावर खूप मोठ्या प्रमाणावर खर्च करण्यात येतो भारतात मात्र हे चित्र उलटे आहे, तसेच देशातील नागरिक आरोग्य विमाच्या बाबतीतही जागरूक नाहीत, आरोग्य विम्याचा केवळ ६.६ टक्के[५] वाटा आरोग्य खर्चाचा आहे.

**निष्कर्ष:**

देशातील सार्वजनिक आरोग्य क्षेत्राचा विकास करण्यासाठी शासनामार्फत विविध धोरणे आणि कायद्याची अंमलबजावणी करण्यात आली आहे. या धोरण आणि कायद्यामुळे देशातील आरोग्य क्षेत्रात सुधारणा झाली आहे. आरोग्य क्षेत्रावर दरवर्षी अर्थसंकल्पाच्या माध्यमातून खर्चाची तरतूद करण्यात येत आहे व या तरतुदीमध्ये दरवर्षी वाढही करण्यात येत आहे. परिणामी देशात आरोग्य सुविधांची उपलब्धता वाढत आहे. देशाची असलेली अफाट लोकसंख्या आणि सार्वजनिक आरोग्य क्षेत्रावर करण्यात येणारा खर्च याचे प्रमाण इतर देशांच्या तुलनेत खूप कमी आहे. त्यामुळे देशातील नागरिकांना दर्जेदार, गुणवत्तापूर्ण सार्वजनिक आरोग्य सुविधा मिळत नाहीत. देशातील नागरिकांमध्ये आरोग्याप्रती जनजागृती नसल्यामुळे खूप कमी प्रमाणामध्ये नागरिक स्वतःचा अथवा कुटुंबाचा आरोग्य विमा उतरवतात. बऱ्याचवेळा पैशाच्या अभावामुळे नागरिकांना दर्जेदार आरोग्य सुविधा मिळत नाहीत.

**संदर्भ:**

1. Ministry of Finance (January 2022), 'Economic Survey 2021-22', Government of India, New Delhi, pg. no. 352.
2. Ministry of Health and Family Welfare (April 2022), 'Rural Health Statistics', Government of India, New Delhi, pg. no. 47.
3. Ministry of Health and Family Welfare (October 2020), 'Health and Family Welfare Statistics in India2019-20', Government of India, New Delhi, pg. no. 44.
4. Ministry of Health and Family Welfare (august 2022), 'National Health Accounts Estimates for India 2018+19', National Health Accounts Technical Secretariat, National Health System Resource Center, Government of India, pg. no. 07.
5. Ibid pg. no. 08.